CMYK

जैविक कचरा प्रकरणी आ. खरात यांचे कारवाईचे निर्देश >>पान 2

उच्च व तंत्र शिक्षण विभागात प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी झिरो पेंडन्सी डेली डिस्पोजल ड्राइव्ह विशेष मोहिम >>पान 3

कोट्यावधी रुपये पाण्यात; डोणगाव तहानलेलेच >>पान 4

सुविचार
सातत्याने काम करणारे कधीही पराभूत होत नाहीत.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




आता पन्नाशीत विशीतील तारुण्य
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 175 ■ बुधवार, दि. 05 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# जल जीवन मिशनचे भ्रष्टाचाराचे केंद्र मेहकर : आ. सिद्धार्थ खरात

भाग ०४



दैनिक आपला विदर्भ

## जलजीवन मिशनच्या कामाच्या चौकशीचा केवळ फार्स

## आमदार सिद्धार्थ खरात यांचा आरोप कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नसल्याची स्पष्टोक्ती

**मेहकर : मेहकर व लोणार तालुक्यामध्ये जलजीवन विषयांची कामे चालू करण्यात आली.जवळपास दीडशे कामेही दोन्ही तालुक्यात असून असून दीर्घ कालावधी नंतरही सदर कामे पूर्ण करण्यात आली नाही. यासंदर्भात चौकशी करण्यासाठी यापूर्वी लोकप्रतिनिधीने लावलेली बैठकी केवळ फार्स आहे. सदर चौकशी बाबत मी अधिकाऱ्यांना माहिती मागितली असता, अधिकाऱ्यांनी अशी कोणतीही प्रकारची चौकशी झाली नाही किंवा त्याचा अहवालही नाही अशी माहिती दिली आहे. त्यामुळे बैठक घेऊन चौकशी करण्याचा देखावा करण्यात आला आहे. अशी टीका आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केली.**




देविदास खनपटे
मुख्य संपादक

आमदार सिद्धार्थ खरात माहिती देताना म्हणाले की, लोणार तालुक्यामध्ये ६० व मेहकर तालुक्यात जवळपास ९० च्या वर जलजीवन मिशनची कामे करण्यास प्रारंभ करण्यात आला. मात्र, दीर्घ कालावधी नंतरही सदर कामे पूर्ण झाली नाहीत.या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचा तक्रारी करण्यात आल्या आहेत. त्या संदर्भात यापूर्वी लोकप्रतिनिधींनी बैठक घेऊन चौकशीचे आदेश दिले असल्याचा देखावा केला आहे.यापूर्वी चौकशीच्या बैठकांचा संदर्भ घेत अधिकाऱ्यांना माहिती मागितली. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नाही आणि कोणताही अहवाल प्राप्त नाही अशी माहिती दिली. यावरून तत्कालीन लोकप्रतिनिधीने केवळ चौकशीचा देखावा केला असल्याचा आरोप आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला आहे. प्रत्यक्षात भ्रष्टाचार करणाऱ्यांना अभय द्यायचे आणि लोकांना भुलविण्यासाठी चौकशीचे आदेश दिले असल्याचे सांगायचे असा प्रकार या अगोदर सुरू असल्याचा आरोपही खरात त्यांनी केला. सदर कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याने कोणतेही कामे पूर्ण झाली नाही. परिणामी जनतेला पाणी मिळाले नाही. आता मात्र, रखडलेले कामे मार्गी लावून प्रत्येक काम पूर्ण करण्यासाठी मी पाठपुरावा करणार आहे आणि गैरप्रकार करणाऱ्यावर कारवाई सुद्धा करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांची बैठक लावणार आहे.जे कोणी दोषी असेल त्यांच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल भ्रष्टाचार करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा यावेळी आमदार खरात यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिला.

### जलजीवन मिशनचे भ्रष्टाचाराचे केंद्र मेहकर

प्रत्येक गावात कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करून जलजीवन मिशनचे काम करण्यात येत आहे. मात्र, हे काम जनतेच्या हिताचे कमी व कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या हिताचेच असल्याचे सुरू असलेल्या कामावरून दिसून येत आहे. कंत्राटदार व संबंधित स्वतःला विकास पुरुष व अधिकाऱ्यांनी मिळून मिसळून जलजीवन मिशनच्या निधीची वाट लावण्याचे काम केले आहे.जलजीवन मिशन ही मेहकर भ्रष्टाचाराचे मुख्य केंद्र मेहकर आहे. त्यामुळे प्रत्येक कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तत्काळ कारवाई करण्याची गरज आहे. या संदर्भात मी पाठपुरावा करून भ्रष्टाचार करणाऱ्यांना सोडणार नाही असा इशाराही उच्च विद्याविभूषित आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला आहे.



## शिर्डी दुहेरी हत्याकांडानंतर साई संस्थानाचे पाऊल, कर्मचाऱ्यांसाठी मोठी घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** शिर्डीच्या साईबाबा संस्थानाच्या दोन कर्मचाऱ्यांवर अनोळखी तरुणांनी धारदार शस्त्राने हल्ला करीत त्यांची निर्घृण हत्या केली. या घटनेनंतर साईबाबा संस्थानाने कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे.

साई संस्थानातील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेत बदल करण्याचा मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय संस्थानाने घेतला आहे. संस्थानातील कर्मचाऱ्यांची पहाटे चार वाजता ड्युटी सुरू व्हायची, ती आता सकाळी सहा वाजता सुरू होईल. शिर्डी दुहेरी हत्याकांडानंतर संस्थानाने हे मोठे पाऊल पाऊल उचलले आहे.

साई संस्थानातील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेत बदल करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी आजपासूनच सुरू करण्यात येईल, अशी माहिती संस्थानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. तसेच हत्याकांडातील पीडितांच्या नातेवाईकांना संस्थानाकडून मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. विमा पॉलिसीसह अन्य मदतही संस्थान मिळवून देणार असल्याचे त्यांनी आश्वस्त केले आहे.



**साई संस्थानाच्या कर्मचाऱ्यांचे नवे वेळापत्रक कसे असेल?**

पहिली शिफ्ट – सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत
दुसरी शिफ्ट – दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत
तिसरी शिफ्ट – रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत
जनरल शिफ्ट – सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत


लुटीच्या उद्देशाने मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी तरुणांनी शिर्डी संस्थानातील दोन कर्मचाऱ्यांची धारदार शस्त्राने हल्ला करीत त्यांचा खून केला. आरोपींनी आणखी एका वयोवृद्धावर असाच हल्ला केल्याने ते देखील गंभीर जखमी आहेत. सुभाष घोडे व नितीन शेजूळ अशी मृत संस्थानातील कर्मचाऱ्यांची नावे आहेत. सुभाष घोडे आणि नितीन पहाटे हे दोघे साई संस्थानामध्ये कामावर जात असतानाच लुटीच्या उद्देशाने आलेल्या अज्ञात आरोपींनी त्यांचा खून केला. तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवले, रक्कम हिसकावून घेतली, संशयावरून पोलिसांना एकाला ताब्यात घेतले.

अज्ञात हल्लेखोरांनी चोरीच्या उद्देशाने तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली. हल्ल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्याने पोलिसांनी किरण सदाफुले याला संशयावरून ताब्यात घेतले आहे.

## ५८ दिवसांनंतर धनंजय मुंडे आक्रमक, दमानियांच्या प्रत्येक आरोपाचे दिले सडेतोड उत्तर; मागचे पुढचे सगळे काढले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अंजली दमानिया यांनी माझ्यावर केलेले सर्व अधिकार धांदत कोठे आहे. माझ्यावर आज झालेले आरोप हे दमानियांच्या स्वभावाप्रमाणे सनसनाटी निर्माण करण्यासाठी त्यांनी केले आहे. आजपर्यंत त्यांनी माझ्यावर केलेले आरोप हे एकही आरोप खरे ठरले नाही, असे म्हणत मंत्री धनंजय मुंडे यांनी अंजली दमानिया यांनी केलेले आरोप फेटाळले आहेत. डीबीटीबाबत सर्व अधिकार मंत्री आणि मुख्यमंर्त्यांना आहेत. अजंलीताई शेतकरी नसल्याने त्यांना माहीत नसेल, असा टोला देखील मुंडेंनी लगावला आहे.



धनंजय मुंडे म्हणाले, मला बदनाम केले जात आहे. आज ५८ वा दिवस आहे माझ्यावर मिडीया ट्रायल सुरू आहे.कोण करत आहे माहीत नाही. डीबीटीमधून कोणतीही बाब वगळण्याचे आणि समाविष्ट करण्याचे अधिकार मंत्री आणि मुख्यमंर्त्याचे आहेत. संपूर्ण प्रक्रिया वित्तमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या परवानगीने केले आहे.

पेरणीपूवी शेतीचीटी मशागत करावी लागते. लोकसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी या सगळ्या गोष्टी लागू करणायात आल्या आहेत. त्यांना शेतीची माहिती नसेल त्यामुळे पेरणीपूर्वी आणि पेरणीनंतर काय काय करावे लागते हे त्यांना माहिती नसेल.

**नॅनो खताच्या खरेदीत भ्रष्टाचार झाला नाही: धनंजय मुंडे**

नॅनो खताबाबतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी प्रोत्साहन दिले आहे. देशातील आपले पहिले राज्य आहे ज्यांने हे सुरू केले.अंजलीताईना माहिती नाही की दीड एकर फवारणी करण्यासाठी मला दोन माणसे लागतात. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत नॅनोची किंमत सगळीकडे एकच आहे. त्यापेक्षा कमी पैशात ते खरेदी झाले. चार लाख शेतकऱ्यांनी ती फवारणी केली. वेळ वाचला, पैसे वाचले. शेतकरी उत्पन्नात वाढ झाले. उत्पन्नात ६० टक्के वाढ होते. चार लाख शेतकरी यांना फायदा झाला. याआधी त्यांनी अनेक जणांना बदनाम केले आता सध्या मला करत आहेत. नॅनो खताच्या खरेदीत भ्रष्टाचार झाला नाही. भ्रष्टाचार झाला म्हणणं म्हणजे शेतकऱ्यांसह देशाला फसवणूक करणे आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.

## मुंबई ते गोवा प्रवास फक्त ६ तासांत; ५ महिन्यात पूर्ण होणार कोकणात जाणारा नवीन महामार्ग

**मुंबई/प्रतिनिधी :** गेले कित्येक वर्ष मुंबई–गोवा महामार्ग रखडलेला आहे. मात्र लवकरच नवीन चौपदरी मुंबई–गोवा महामार्ग प्रवाशांच्या सेवेत येणार आहे. सध्या गोव्याला जाण्यासाठी १२ तासांहून अधिक वेळ लागतो. मात्र आता हा वेळ अर्ध्यावर येणार आहे. मुंबई–गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. मे किंवा जून २०२५पर्यंत पूर्ण होणार आहे.

मुंबई–गोवा महामार्ग एकूण ४६६ किमीचा आहे. रस्त्याचे काम झाल्यानंतर केवळ ६ तासात मुंबईहून गोवा गाठता येणारे आहे. या मार्गादरम्यान ४१ बोगदे आणि २१ पूल उभारले जाणार आहेत. माणगाव, इंदापूर, पाली, लांजा, कोलाड आणि चिपळूण या गावात बायपास आणि पुलांचे बांधकाम सध्या सुरू आहे. महामार्गाला होत असलेल्या विलंबामुळे प्रकल्पाचा खर्च ७,३०० कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

## बारावी, दहावीच्या परीक्षांदरम्यान कॉपीमुक्त अभियान यशस्वी करा - मुख्य सचिव सुजाता सौनिक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२५ ची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. बारावी) परीक्षा दि. ११ फेब्रुवारी ते दि. १८ मार्च २०२५ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. दहावी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी ते दि. १७ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांच्या पार्श्र्वभूमीवर कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त आणि निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्र्वभूमीवर मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत यासंदर्भात आढावा घेतला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यावेळी उपस्थित होते. तर शालेय शिक्षण आयुक्त, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.



मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार शिक्षण मंडळामार्फत राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराद्वारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल. परीक्षा सुरू होण्याच्या एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का ? याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री केली जाईल. परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व विभागांचे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात येणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्र संचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधीत घटकांची फेशियल रेकग्निशन सिस्टीमद्वारे तपासणी करण्यात येईल. तसेच विभागीय मंडळामार्फत परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना अधिकृत ओळखपत्र देण्यात येईल. महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस क्ट १९८२ या कायद्याची अंमलबजावणी करुन व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येतील तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येईल.

मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या या उपाययोजनांची सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व परीक्षेशी संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मंडळाच्या सचिव डॉ.माधुरी सावरकर यांनी केले आहे.

## 'धनंजय मुंडे पहिल्यापासून लफडेबाज, ३०२ दाखल करा', अजित पवारांचा उल्लेख करत जरांगे कडाडले

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर १६० कोटींच्या घोटाळ्यासह विविध आरोप केले आहेत. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांसमोर काही पुरावे देखील सादर केले. दमानिया यांच्या पत्रकार परिषदेनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील धनंजय मुंडेंवर निशाणा साधला आहे. धनंजय मुंडे पहिल्यापासून घोटाळेबाज आणि लफडेबाज आहे, त्यांच्यावर ३०२ कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करावा. तेच संघटीत गुन्हेगारी चालवत आहेत, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. जरांगे यांच्या वक्तव्यानंतर राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे.

दरम्यान मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख करत धनंजय मुंडे यांना मंत्रीपदावरून हटवण्याची मागणी केली. मुंडेंनी मंत्रीपदावरून राहून पुरावे नष्ट केले आणि संतोष देशमुख खून आणि खंडणी प्रकरणातील एकही आरोपी सुटला तर आम्ही अजित पवार आणि देवेंद्र फडणवीसांना जबाबदार धरू अशी संतापजनक प्रतिक्रिया जरांगे यांनी दिली आहे.



मुंडेंवर आरोप करताना जरांगे म्हणाले, ''आपण कुणावर उगीच आरोप करत नाही, पण धनंजय मुंडे मंत्रीपदाच्या जोरावर अधिकाराचा वापर करून पुरावे नष्ट करणं, आत बाहेर काही गोष्टी पुरवणं. यांच्या मनानुसार यांना तुरुंग मिळवणं, असे प्रकार केले जात आहेत. अद्याप तपासात आरोपी सापडत नाहीत. आरोपींच्या लिंक सापडत नाहीत. त्यांच्या मालमत्ता जप्त केल्या जात नाहीयेत. अजित दादा तुमच्याकडे एकच म्हणणे आहे, धनंजय मुंडे मंत्रीपदाच्या जोरावर बाहेर राहून पुरावे नष्ट करीत आहे. हे पुरावे नष्ट झाले, खंडणी आणि खूनातला एकही आरोपी सुटला तर अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांना जबाबदार धरू.''

धनंजय मुंडे यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याच्या मागणीवर देखील मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुंडे यांच्यावर मोक्का लावून काय होणार, त्यांच्यावर थेट ३०२ चा गुन्हा दाखल करायला हवा. तेच संघटीत गुन्हेगारी घडवून आणताय. तेच या सगळ्यांचे मालक आहेत, असा आरोपही जरांगे यांनी केला.

CMYK

# जैविक कचरा प्रकरणी आ. खरात यांचे कारवाईचे निर्देश

### वैद्यकीय अधिकारी यांचे ठाणेदाराला पत्र चौकशी करून कारवाईची केली मागणी

### पोलीस प्रशासन नेमकी काय भूमिका घेते याकडे जनतेचे लागले लक्ष..!

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** मानवी शरीरासाठी घातक असलेला जैविक कचरा अज्ञात व्यक्तीने येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीलगत टाकून त्या जैविक कचऱ्याला आग लावल्याची घटना २ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. या गंभीर प्रकाराबाबत दैनिक आपला विदर्भ ने वृत्त प्रकाशित करून संबंधित विभागाची पोलखोल केली होती. दैनिक आपला विदर्भने वृत्ताची दखल घेत आमदार सिद्धार्थ खरात यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करावी, असे निर्देश आरोग्य विभागाला दिले आहे. डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती लगतच अज्ञात व्यक्तीने जैविक कचरा टाकला. त्या जैविक कचऱ्यामध्ये अनेक प्रकारचे सलाईन सोनोग्राफी, इंजेक्शन, औषधी बाटल्या व इतरही साहित्य होते. हा जैविक कचरा मानवी शरीरासाठी मोठा घातक मानला जातो. अशा घातक कचऱ्याला रस्त्यावरच रस्त्याच्या कडेलाच नष्ट करण्याचा काम अज्ञात व्यक्तीने केले. येथील जैविक कचरा प्रकरणी संबंधित दोषीवर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता असताना अधिकाऱ्यांनी मात्र, याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे अनेक शंका कुशंका निर्माण होत आहेत. रस्त्यावर जैविक कचरा टाकून जाळण्यात आलेल्यामध्ये कचऱ्यामध्ये अनेक संशयास्पद अहवाल सोनोग्राफी तसेच इतर साहित्य असल्याचे नागरिकाचे म्हणणे असून यामध्ये अनेक गैरप्रकारातून हा जैविक कचरा रस्त्यावर आणून जाळला असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.अत्यंत घातक असलेल्या या जैविक कचरा कचऱ्याचे विल्हेवाट लावण्याची नियमावली असताना संबंधितांकडून रस्त्यावर फेकून मनमानी केली जात आहे.हा प्रकार अत्यंत गंभीर असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करावी, असे असे निर्देश आमदार सिद्धार्थ खरात यांनी बुलढाणा येथील डीएचओला दिले आहेत.





### वैद्यकीय अधिकाऱ्याचे ठाणेदाराला पत्र

डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र च्या इमारती बाहेर अज्ञात व्यक्तीकडून जैविक कचरा रस्त्यावर टाकून तो जाळण्यात आला आहे. सदर प्रकरणाची चौकशी करून दोषीवर कारवाई करावी, असे पत्र डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ४ फेब्रुवारी रोजी डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदारांना देण्यात आले आहे.

### पोलीस प्रशासनाच्या भूमिकेकडे जनतेचे लक्ष

डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती बाहेर अज्ञात व्यक्तीने जैविक कचरा टाकून तो जळाल्याचा प्रकार घडला आहे या जैविक कचऱ्यामध्ये अनेक संचायास्पद अहवाल जळल्याची चर्चा डोणगाव मध्ये आहे. याप्रकरणी प्राथमिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणाची चौकशी करून दोषवर कारवाई करावी यासाठी डो णगाव पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांना पत्र दिले आहे. आता डोणगाव पोलीस या प्रकरणाचे कशी चौकशी करतात व कोणावर कारवाई करतात.याकडे डोणगाव येथील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.सदर प्रकरण दोषीवर कारवाई करण्यासाठी पोलीस प्रशासनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## ट्रम्प यांच्या निर्णयामुळे व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेऊन ३० दिवसही उलटले नाहीत तोवर धडाकेबाज निर्णय घेऊन जगाला हादरवून सोडले आहे. राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतच त्यांनी अमेरिका फर्स्ट ही घोषणा केली होती. अमेरिकेच्या हितासाठी जे काही करता येईल ते मी करेल त्यासाठी जगाशी लढावे लागले तरी बेहत्तर अशी घोषणा त्यांनी निवडणूकी दरम्यान केली होती त्यांच्या याच घोषणेमुळे ते निवडून आले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच त्यांनी त्या दिशेने पावले टाकली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडा या देशातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के तर चीन मधून आयात होणाऱ्या वस्तूंवर १० टक्के अतिरिक्त कर लावला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे मेक्सिको , कॅनडा आणि चीन या देशांनाच नाही तर जगाला ही हादरा बसला आहे . कारण त्यांच्या या निर्णयामुळे आता जगात व्यापार युद्ध सुरू होईल अशी चिंता जाणकारांनी व्यक्त केली आहे. अमेरिकेने या तिन्ही देशांवर लावलेल्या अतिरिक्त करांना या तिन्ही देशांनीही जशास तसे उत्तर दिले आहे. मेक्सिकोच्या राष्ट्रपती क्लाडिया शिणबन यांनी आपल्या अर्थमंत्र्यांना देशहितासाठी अमेरिकन वस्तूंवर अतिरिक्त कर लावण्यास सांगितले आहे. कॅनडाने अमेरिकेचा निषेध व्यक्त करत अमेरिकन वस्तूंवर तितकाच म्हणजे २५ टक्के अतिरिक्त कर लावण्यात येईल असा इशारा दिला आहे. चीनही जागतिक व्यापार संघटनेमध्ये ट्रम्प यांना आव्हान देऊन प्रतीकात्मक पाऊल उचलण्याची शक्यता आहे. जगातील या चार मोठ्या देशात एक प्रकारे हे व्यापार युद्धच सुरू झाले आहे त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो परिणाम महागाई मोठ्या प्रमाणात वाढू शकते. ट्रम्प यांच्या या निर्णयाने जगातील सर्वच मोठ्या देशांचे धाबे दणाणले आहे. ट्रम्प यांची वक्रदृष्टी केंव्हाही आपल्यावर पडू शकते अशी भीती अनेक देशांना वाटू लागली आहे. भारताने याबाबत जाहीरपणे चिंता व्यक्त केली नसली तरी भारतातही या निर्णयाचे सावट पसरले आहे. भारताने या निर्णयावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही मात्र भारत सावध पावले टाकत आहे हे नक्की. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुढील महिन्यात अमेरिकेचा दौरा करण्याची शक्यता आहे. त्यावेळी चर्चेत हा मुद्दा येऊ शकतो मात्र सध्या तरी भारताने सावध राहायला हवे. ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील याचा नेम नाही. आधीच त्यांच्या एका निर्णयाने अमेरिकेतील भारतीयांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. ट्रम्प अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांना बाहेर काढण्याच्या तयारीत आहेत. अमेरिकेत कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांना बेकायदेशीर स्थलांतरित म्हणून संबोधले जाते. प्यू रिसर्च च्या अहवालानुसार अमेरिकेत ७. २५ लक्ष बेकायदेशीर भारतीय स्थलांतरित राहतात या बाबतीत भारत मेक्सिको आणि साल्वाडोर नंतर तिसऱ्या स्थानावर आहे. एका वृत्तानुसार अमेरिकन प्रशासनाने अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहत असलेल्या भारतीयांना भारतात परत पाठवण्यासाठी एक योजना आखली असून त्यासाठी त्यांनी एक खास लष्करी विमान तयार ठेवले आहे. राष्ट्राध्यक्षपदी आरूढ झाल्यानंतर ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे जगात व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता आहे त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होणार आहे त्यामुळे जगभर खळबळ माजली आहे.

# 'त्या' लाडक्या बहिणींना मोठा झटका!

## १०,५०० रूपये सरकारला परत करावे लागणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सरकारने लाभार्थी महिलांची अर्जाची छाननी सूरू केली आहे. या छाननीमध्ये ज्या महिलांनी निकषांना डावलून योजनेचा लाभ घेतला आहे. त्या महिलांना योजनेचे पैसे परत करावे लागणार आहे. यासाठी सरकार महिलांना आवाहन देखील करत आहेत. अशात आता सरकारने या अर्जाच्या छाननी प्रक्रियेला आणखीणच वेग दिला आहे. त्यानुसार आता सरकार अंगणवाडी सेविकांना लाभार्थी महिलांच्या घरोघरी पाठवणार आहे. अंगणवाडी सेविकांच्या या पडताळणती जर महिला निकष डावलून लाभ घेत असल्याचे समोर आले तर त्यांना आतापर्यंत खात्यात आलेले १० हजार ५०० रूपये सरकारला परत करावे लागणार आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना मोठा झटका बसला आहे.

खरे तर महिला व बाल कल्याण विभागाने लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जाची छाननी सूरू आहे. या छाननीसाठी आयकर आणि परिवहन विभागाची मदत घेतली जाणार आहे. आयकर विभाग महिलांच्या पैशांचे विवरण सांगणार आहे. तर परिवहन विभाग महिला राहत असलेल्या घरात चारचाकी आहे की नाही? याची माहिती देणार आहे. या दरम्यानच आता सरकारने अर्जाच्या छाननीला आणखी वेग दिला आहे.सरकार आला थेट अंगणवाडी सेविकांना लाभार्थी महिलांच्या घरी पाठवणार आहे.

चारचाकी वाहन असणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्याचा निर्णय याआधीच घेण्यात आला होता. या संदर्भात सरकार परिवहन विभागाकडून देखील माहिती मिळवत होती. त्यानंतर आता सरकार अंगणवाडी सेविकांना लाभार्थी महिलांच्या घरी पाठवणार आहे. यावेळी अंगणवाडी सेविकांच्या पडताळणीत जर महिलांच्या कुटुंबात चारचाकी असेल त्यांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे. त्यामुळे या महिलांना मोठा धक्का बसणार असून त्यांना योजनेचे पैसे परत करावे लागणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार सासरे, दीर, अथवा घरातील इतरांच्या नावावर चारचाकी असेल आणि लाभार्थी महिला पती आणि मुलासोबत वेगळी राहत असेल तर या महिलेला योजनेचा लाभ सूरूच राहणार आहे.

दरम्यान लाडकी बहीण योजनेची सुरूवात जुनपासून करण्यात आली होती. त्यानंतर जुलैपासून महिलांच्या खात्यात सरकारने १५०० रूपये जमा करायला सुरूवात केली होती.आतापर्यंत महिलांच्या खात्यात सात हप्त्याचे १० हजार ५०० रूपये खात्यात जमा झाले आहेत. आता महिलांना फेब्रुवारी महिन्यात येणाऱ्या १५०० रूपयांची प्रतिक्षा आहे. हे पैसे कदाचित फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान हे पैसे खात्यात येईपर्यंत जर अर्ज बाद झाला तर सर्व पैसे परत करावे लागण्याची शक्यता आहे.

## आता पन्नाशीत विशीतील तारुण्य

**मुंबई/प्रतिनिधी :**मराठी सिनेसृष्टीतील एक उत्तम अभिनेत्री म्हणून त्यांनी नाव कमावलं. विविध जाहिराती, मालिका, चित्रपट तसेच हिंदी मालिकांमध्येही स्वतःचा ठसा ऐश्र्वर्या नारकर यांनी उमटवला. १९९७ पासून ते आता पर्यंत त्यांनी अनेक भूमिका साकारल्या. महाश्र्वेता सारख्या गाजलेल्या मालिकेतील त्यांच्या कामाने त्यांना प्रसिद्धी दिली.

अभिनय क्षेत्रातल्या अगदी सुरूवातीच्या कामापासून ते अगदी आता व्हायरल होणाऱ्या रीलपर्यंत आयुष्यातील सगळ्या गोष्टींवर ऐश्र्वर्या नारकर यांनी आरपार या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीती त्यानी काही किस्से सांगितले. ३० पेक्षा अधिक वर्षांच्या कामामध्ये त्यांनी अनेक भूमिका साकारल्या 'छल, क्षय और मात या हिंदी मालिकेतून त्यांनी पहिल्यांदा नकारात्मक भूमिका साकारली तर मराठी मधील सातव्या मुलीची सातवी मुलगी यातील रुपाली ही आयकोनिक ठरली'. सोशल मीडियावर सध्या ट्रेंडिंग असलेल्या रील्स वरही ऐश्र्वर्याने आपला दबदबा कायम आहे.

या मुलाखतीत त्यांनी अनेक गोष्टींचा उलगडा केला. त्यांचा सकारात्मक भूमिकांपासून ते अगदी नकारात्मक भूमिकांपर्यंतचा त्यांचा प्रवास आणि अनुभव त्यांनी सांगितलं. या मुलाखतीत त्यांचा आयुष्यात घडलेला तो गमतीशीर किस्सा त्यांनी सांगितला, 'त्या म्हणाल्या माझ्या 'घे भरारी' या चित्रपटाच्या दरम्यान माझं वजन खूप वाढलं होत, मी अशी फार गुबगुबीत दिसत होती. या चित्रपटात मी माझ्या दिराची माझ्यावर वाईट नजर असते म्हणून खून करते आणि नंतर मला जेलमध्ये जावं लागत. पण गंमत म्हणजे त्यावेळेस माझं वजन इतकं वाढलं होत की, दिग्दर्शकांनी मला वजन कमी करण्यास सांगतलं पण, त्यावेळी त्यांनी त्या चित्रपटात मी लहान दिसावं म्हणून माझ्या आजूबाजूला अशा बायका त्यांनी कास्ट केल्या ज्या माझ्यापेक्षा सुधृढ असतील.

आणि त्यानंतर मी स्वतःवर लक्ष देणं सुरु केलं

'घे भरारी' या चित्रपटानंतर मी स्वतःवर लक्ष देणं सुरु केलं. मी २००९-२०10 च्या दरम्यान जिम, योगा, व्यायाम मी सुरु केले, असं ऐश्र्वर्या नारकर यांनी सांगितलं. हे सुरुवात करणं कठीण असतं का? असा प्रश्र्न विचारला असता, त्यांनी उत्तर देत सांगितलं, त्यावेळेस मला स्वतःलाच खूप खराब वाटत होत, आणि आपण ऑन स्क्रीन दीडपट जास्त दिसतो त्यामुळे मी आणखीनच जाड वाटत होते. त्यानंतर मी स्वतःवर लक्ष देऊ लागली आणि मी आता नियमित व्यायाम करते.

## किती जणांचा मृत्यू झाला? नेमके सत्य काय?, कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनेवरून मल्लिकार्जुन खरगे आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज (दि.३ फेब्रुवारी) दुसरा दिवस आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये महाकुंभमेळ्यात घडलेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेवरून आरोप-प्रत्यारोप झाले. राज्यसभेच्या सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यानंतरच विरोधी पक्षाच्या खासदारांनी प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीचा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेबाबत सभागृहात चर्चेची मागणी करण्यात आली होती. मात्र, विरोधी खासदारांची ही मागणी मान्य न केल्यामुळे खासदारांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केल्याचंही पाहायला मिळाले.

दरम्यान, यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे देखील सभागृहात बोलताना विविध मुद्यांवरून चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. मल्लिकार्जुन खरगे यांनी महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीबाबत आपले म्हणणे मांडत असताना चेंगराचेंगरीच्या घटनेतील मृत्यूंच्या आकडेवारीबाबत शंका उपस्थित केली. यावरून राज्यसभेचे सभापती जगदीप धनखर आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यात शाब्दिक चकमकही झाल्याचं पाहायला मिळालं. ''महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनेत किती जणांचा मृत्यू झाला? या घटनेतील सत्य आकडेवारी समोर येत नाही'', असं म्हणत मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारला जाब विचारला.

मल्लिकार्जुन खर्गे काय म्हणाले?

राज्यसभेत बोलातना मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं की, ''महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत अनेक

# टाटा मोटर्सची महाराष्ट्र सरकारसोबत जलस्रोत संवर्धनांसाठी हातमिळवणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जल संसाधनांची सुरक्षा आणि ग्रामीण समुदायांची उन्नती करण्यासाठी टाटा मोटर्सनं महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारावर (एम ओयू) स्वाक्षरी केलीय. या करारांतर्गत राज्यातील पाणीटंचाई असलेल्या भागात २० हून अधिक जिल्ह्यांमधील १००० जलस्रोतांचे संवर्धन करण्यात येणार आहे. २०२४ मध्ये, टाटा मोटर्सनं महाराष्ट्र सरकारच्या जमीन व जल संवर्धन विभाग, नाम फाऊंडेशन आणि स्थानिक समुदायांसोबतच्या सहयोगाने 'गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार योजनेतून महाराष्ट्रातील ३५६ जलस्रोतांचं संवर्धन केलेय.

हा सहयोग अधिक दृढ करत टाटा मोटर्सचा विदर्भ तसंच मराठवाडाच्या पाणीटंचाई असलेल्या प्रांतांसह राज्यातील २० हून अधिक जिल्ह्यांपर्यंत जल संवर्धन उपक्रम घेऊन जाण्याचा मनसुबा आहे. प्रस्तावित सहयोगाचा राज्यातील अमरावती, लातूर, चंद्रपूर, नागपूर, नांदेड, परभणी, अकोला, गडचिरोली, यवतमाळ, धाराशीव, छत्रपती संभाजी नगर, अहिल्या नगर, सांगली, सोलापूर, पुणे, पालघर, ठाणे आणि इतर जिल्ह्यांमधील १००० जलस्रोतांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमासाठी नाम फाऊंडेशनचे अंमलबजावणी सहयोग असणार आहे.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्सच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे प्रमुख विनोद कुलकर्णी म्हणाले, ''आम्हाला राज्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या समस्यांचे निराकरण करायचेय. त्यासाठी महाराष्ट्र सरकार तसंच नाम फाऊंडेशन सोबतचा आमचा सहयोग अधिक दृढ झाल्याचा आम्हाला अभिमान आहे. २०२४ मध्ये ३५६ जलसाठ्यांचे आम्ही यशस्वीरित्या संवर्धन केलेय. त्यामुळे आम्हाला हा उपक्रम २० हून अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारित करण्यासाठी प्रेरणा मिळालीय. या उपक्रमातून भूजल पातळी, शुद्ध पिण्याचे पाणी, वर्षभर सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या प्रयत्नामुळे गावकऱ्यांच्या उदरनिर्वाहामध्ये सुधारणा होईल.''



या उपक्रमाबाबत महाराष्ट्रा सरकाच्या विशेष कर्तव्य अधिकारी, प्रिया खान म्हणाल्या, ''महाराष्ट्र सरकारने विद्यमान धरणे, जलस्रोतांमधील पाण्याची क्षमता वाढवण्यासाठी 'गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजना' सुरू केलीय. या उपक्रमाने व्यक्तींच्या पुढाकाराला गती दिली आहे, ज्याचे श्रेय टाटा मोटर्स तसंच नाम फाऊंडेशनसह आमच्या सहयोगी संस्थांच्या बहुमूल्य पाठिंब्याला जाते. यांच्या सहयोगाने, आम्ही जलस्रोतांचे संवर्धन करत आहोत, तसंच राज्यामध्ये सतत येणाऱ्या दुष्काळांच्या परिणामाला कमी करण्यासाठी श्वासत विकासाला गती देत आहोत.''

नाम फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात म्हणाले, ''नाम फाऊंडेशननं २०१५ मध्ये महाराष्ट्रातील तीव्र पाणीटंचाई समस्येचं निराकरण करण्यास सुरूवात केली. टाटा मोटर्स आणि महाराष्ट्र सरकारसोबतचा आमचा सहयोग या प्रयत्नांच्या दिशेनं मोठं पाऊल आहे. गेल्या वर्षी आम्ही सहयोगानं आमचे कार्य दहा जिल्ह्यांपर्यंत विस्तारित केलंय. आम्हाला जल संवर्धनाचे सकारात्मक परिणाम आता अधिकाधिक जिल्ह्यांपर्यंत पोहोचणार असल्याचा आनंद आहे.''

२०२४ मध्ये, टाटा मोटर्स आणि नाम फाऊंडेशननं पुणे, पालघर, ठाणे, सातारा, धुळे, सोलापूर, चंद्रपूर, अहमदनगर, बीड व लातूर या १० जिल्ह्यांमध्ये जवळपास ६० लाख घनमीटर गाळ काढत ३५६ जलस्रोतांचे यशस्वीरित्या संवर्धन केले होते. या सहयोगात्मक प्रयत्नानं जवळपास ७००० दशलक्ष जलसाठा निर्माण झाला आहे. ज्यामुळे ७,००० शेतकऱ्यांना फायदा होण्यासोबत पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढवण्यास मदत झाली. त्यामुळं राज्यातील ग्रामीण भागात पिण्यायोग्य पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले. गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार योजनेच्या माध्यामातून उत्खनन केलेला गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांपर्यंत नेण्यासाठी निधी देते, ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. डिजिटल मॉनिटरिंग यंत्रणेमुळे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यामध्ये गतीशीलता, तसेच पारदर्शकता आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शिवसेना ठाकरे गटातील महिला आघाडीचा ठाण्यात हळदीकुंकू सोहळा, रश्मी ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** शिवसेना महिला आघाडीच्या वतीने आज ठाण्यातील गोदुताई परुळेकर मैदानावर हळदीकुंकू सोहळा दणक्यात पार पडला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारो महिलांनी वाण लुटले. यावेळी विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणार्या महिलांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला. या सोहळ्याच्या निमित्ताने ठाण्याचे मैदान महिलांच्या गर्दीने ओव्हरपॅक झाले होते. रश्मी ठाकरे यांनी मोठ्या आस्थेने महिलांशी संवाद साधून त्यांची विचारपूस केली.

### माणसावर हल्ला करुन रस्ता ओलांडताना वाहनाच्या धडकेने बिबट्या ठार



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** माळशिरस तालुक्यामध्ये आज संध्याकाळी बिबट्याने मोठी दहशत माजवली. बिबट्याने एका व्यक्तीवर हल्ला चढवला. त्यानंतर बिबट्या पळून जात असताना अज्ञात वाहनाच्या धडकने बिबट्या ठार झाला. रस्ता ओलांडात असताना बिबट्याला वाहनाची धडक बसली. माळशिरस तालुक्यातील दसुर येथे आज सायंकाळीच्या सुमाराची ही घटना घडली. बिबट्या ठार पावल्याने नागरिकांनी बघ्याची मोठी गर्दी केली.

### मराठी बोलल्यावरुन पुन्हा मराठी माणसाला हिन वागणूक



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :**एक डोंबिवलीकर जेष्ठ नागरिकाला मराठीत बोलल्यामुळे अपमानस्पद वागणूक मिळाली. एव्हढच नाही तर कुठेही तक्रार करा आमचं कोणीही वाकडं करू शकणार नाही असा इशाराही मुंबईत झालेल्या एका प्रदर्शन कार्यक्रमात डोंबिवलीकर रमेश विठ्ठल पारखे यांना देण्यात आला. यामुळे संबंधित जी.पी.ओ. पोस्ट खात्यातील अधिकार्‍यांना पारखे यांनी लेखी तक्रार केली असून आता याविषी राज्य सरकार काय भूमिका घेते या प्रतिक्षेची पारखे वाट पाहत आहेत. या विषयी रमेश पारखे यांनी सांगितल्याप्रमाणे पोस्ट खात्यातर्फे महापेक्स २५ हे प्रदर्शन २२ ते २५ जानेवारी रोजी असे चार दिवस मुंबईत वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात डोंबिवलीकर पारखे यांना काही साहित्य खरेदी करायचे होते. तेव्हा खिडकी नंबर ३२ वर असलेल्या व्यक्तीशी याविषयी मराठी भाषेत संभाषण केले असता हिंदीत बोला असे सांगण्यात आले. परंतु पारखे यांनी हिंदीत का आपणांस मराठी येत नाही का असा प्रतिप्रश्र्न केला. तेव्हा हिंदीतच बोला असे सांगण्यात आले, इतकेच नाही तर माझ्याबद्दल कुठेही तक्रार करा माझे काहीही बिघडणार नाही, मी मराठी बोलणार नाही असा तोरा केला. असा ताठर वागणुकीमळे पारखे यांनी तक्रार केली असल्याचे सांगितले. आमच्या मराठी भाषेला राज्य भाषा दर्जा मिळाला असून जर अशी वागणूक दर वेळी मिळत असेल तर न्याय कोणाकडे मागायची अशी विचारणा आता पारखे करीत आहेत.

### धनंजय मुंडेंना पाठिंबा दिल्याने नामदेव शास्त्री अडचणीत, पुण्यातील कीर्तन रद्द करण्याची मराठा समाजाची मागणी

**पुणे/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख अपहरण आणि हत्या प्रकरणावरून मंत्री धनंजय मुंडे यांची पाठराखण करणाऱ्या नामदेव शास्त्रींच्या कार्यक्रमाला विरोध होताना दिसत आहे. पुण्याच्या देहूतील भंडारा डोंगरावर नामदेव शास्त्री महाराजांचे कीर्तन येत्या ७ फ`ब्रुवारी ला होणार आहे. मात्र हे कीर्तन रद्द करावे, अशी म ागणी अखिल मराठा समाजाने भंडारा डोंगर सप्ताह समितीकडे करण्यात आली आहे. भंडारा डोंगर मंदिर समिती याबाबत काय निर्णय घेते याकडे सर्वांचं लक्ष आहे. या मागणीला दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची किनार आहे. भंडारा डोंगरावर अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे, या सप्ताहात शास्त्री महाराजांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आलं आहे.

## उच्च व तंत्र शिक्षण विभागात प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी

# झिरो पेंडन्सी डेली डिस्पोजल ड्राइव्ह विशेष मोहिम

दैनिक आपला विदर्भ

- मुंबई विभागातील ४१६ न्यायप्रविष्ठ आणि दीर्घकालीन प्रलंबित प्रकरणे निकाली
- विभागातील एकही प्रकरण प्रलंबित राहता कामा नये, सर्व प्रकरणे वेळेत निकाली काढावे
- मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे स्पष्ट निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** उच्च व तंत्र शिक्षण विभागातील प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतिमान होण्यासाठी झिरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोजल ड्राइव्हही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मुंबई विभागातील ४१६ प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात आली आहेत. विभागातील एकही प्रकरण प्रलंबित राहता कामा नये, सर्व प्रकरणे वेळेत निकाली काढावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

आज मुंबई सहसंचालक कार्यालयात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांनी अचानक भेट देऊन झिरो पेंडन्सी विशेष मोहिमेंतर्गत प्रलंबित प्रकरणांच्या कार्यवाहीचा आढावा घेतला.यावेळी उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, संचालक शैलेंद्र देवळणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक,उच्च शिक्षण सहसंचालक रुपेश राऊत संबंधित अधिकारी उपस्थित होते.

विभागातील प्रत्येक प्रकरणाचा जलदगतीने निकाल लावा.विलंबाचे कारण काय आहे, याचा सखोल तपास करा. जाणूनबुजून दिरंगाई होत असल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.संपूर्ण विभागातील प्रलंबित प्रकरणांचा मी स्वतः पुन्हा आढावा घेईन. जर कोणत्याही अधिकाऱ्याने जाणूनबुजून काम लांबवले असेल, तर त्याला गंभीर परिणाम भोगावे लागतील. एकही प्रकरण प्रलंबित राहता कामा नये. विभागातील सर्व प्रकरणे वेळेत निकाली काढा.असे स्पष्ट निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिले.

उच्च व तंत्र शिक्षण विभागात न्यायप्रविष्ट प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी ठोस नियोजन करून न्यायालयीन आणि प्रशासकीय प्रकरणांचा कालबद्ध नियोजन करावे, दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुंबई विभाग स्तरावर ४८५ प्रकरणे प्रलंबित होती. मात्र, १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत विभागाने ४१६ प्रकरणे निकाली काढली. उर्वरित प्रकरणांमध्ये काही त्रुटी असतील तर त्या संबंधित महाविद्यालयांना,नागरिकांना कळवावे आणि वेळेत निकाली काढावे.अशा सूचनाही मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी दिल्या.

उच्च व तंत्र शिक्षण विभागात मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयांसह विविध न्यायालयांमध्ये विभागाची ३ हजार २०० हून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे राज्य सरकारवर मोठा आर्थिक आणि प्रशासकीय ताण पडत आहे. या पार्श्र्वभूमीवर, न्यायालयीन प्रकरणांचे कालबद्ध नियोजन करून जलदगतीने निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.या मोहिमेत प्रलंबित प्रकरणे जलद सोडवली जात असल्याने वेळेची आणि आर्थिक बचत होत असून नागरिकांना अधिक समाधानकारक सेवा मिळत आहे आणि प्रशासन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. ही जनतेला समाधान देणारी बाब आहे. असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले.



या विशेष मोहिमेत एकाच विषयावरील अनेक याचिका/खटले एकत्र करून त्यांचे एकत्रिकरण केले जात आहे.तसेच शासनावर मोठा वित्तीय भार येणारी प्रकरणे आणि विद्यार्थी हितासाठी महत्त्वाची प्रकरणे प्राधान्याने सोडवली जात आहेत.यामध्ये वेतनवाढ, वैद्यकीय प्रतिपूर्ती, पदोन्नती आणि निवृत्तीवेतनाशी संबंधित प्रलंबित प्रशासकीय प्रकरणे, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्र्चिती, अनुकंपा, सेवाखंड, सेवानिवृत्ती लाभ, भविष्य निर्वाह निधी आणि वैयक्तिक लाभांच्या प्रकरणांची सोडवणूक असे विषय युद्धपातळीवर सोडवली जात असल्याचेही मंत्री उच्च व तंत्र शिक्षण श्री.पाटील यांनी सांगितले.

### शिवराज राक्षेवर अन्याय..., डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांचा तडकाफडकी निर्णय, दोन्ही गदा परत करणार!

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील पंचांच्या निर्णय वादावरून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांनी आपली महाराष्ट्र केसरीच्या दोन्ही गदा परत देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पंचांचे चुकीच्या निर्णयामुळे आपल्याला ट्रिपल महाराष्ट्र केसरी होताना पराभवाला समोर जावे लागले होते. आता हीच वेळ शिवराज राक्षेवर आलीये, असे म्हणत त्यांनी पंचांवर टीका केली. तसेच माझ्यावर आक्षेप झाला, याची कबुली कमिटीच्या सर्व सदस्यांनी द्यावी, असे म्हणत चंद्रहार पाटलांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.शिवराज वाक्षेच्या पंचांच्या लाथ मारण्याच्या घटनेवरून पंचाला गोळ्या घातल्या पाहिजे होत्या. असं वादग्रस्त विधान केलं होतं. त्यानंतर आता चंद्रहार पाटील यांनी शिवराज राक्षेसाठी दंड थोपटले आहेत.सांगली जिल्ह्याला मी २८ वर्षानंतर महाराष्ट्र केसरी मिळवून दिली. ३५ वर्षानंतर मी डबल महाराष्ट्र केसरी झालो. तोपर्यंत कुणीही डबल महाराष्ट्र केसरी नव्हतं. ट्रिपल महाराष्ट्र केसरीसाठी उतरणारा पैलवान मी पहिली होतो. इतिहासात असं कधीच झालं नव्हतं. पण आज जसा शिवराज राक्षेवर अन्याय झाला, तसंच मला देखील ट्रिपल महाराष्ट्र केसरी होत असताना मला हरवण्यात आलं. काका साहेब पवारांनी कबुली दिली आहे की, चंद्रहार पाटलांवर अन्याय झाला होता. संदीप बोंडवे यांनी देखील कबुली दिली होती. माझ्या मानाचं समाधान होईल, यासाठी सर्वांनी कबुली दिली पाहिजे.

## माजी आ. वैभव नाईक यांना एसीबी ने बजावली नोटीस

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** कुडाळ मालवण मतदारसंघाचे माजी आमदार वैभव नाईक यांच्या म ालमत्तेच्या अनुषंगानं लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांच्याकडून चौकशी सुरू होती. आता याप्रकरणी पुन्हा चौकशीकामी जबाब नोंदविण्यासाठी वैभव नाईक आणि त्यांची पत्नी स्नेहा नाईक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी येथे ११ फेब्रुवारी रोजी उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठवलं आहे. नाईक यांना यापूर्वीही अनेकदा नोटीस पाठवण्यात आली होती आणि चौकशीही करण्यात आली होती. त्याचबरोबर नाईक यांच्या मालम त्तेची तपासणी करण्यात आली होती. तसेच त्यांच्या संबंधित नातेवाईक, मित्र यांचीही चौकशी करण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर पुन्हा नोटीस बजावण्यात आल्यानं खळबळ उडाली आहे.

पत्रात काय आहे? : या पत्रात म्हटलं आहे की, ''उपरोक्त संघर्भाधीन विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या मालमत्तेच्या अनुषंगानं लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात येत आहे. सदर उघड चौकशीच्या अनुषंगानं आपण ५ डिसेंबर २०२२ रोजी अँ कार्यालय रत्नागिरी येथे आपली पत्नी स्नेहा वैभव नाईक यांच्यासह उपस्थित राहिलात. परंतु, लोकप्रतिनिधी कालावधीतील आपली मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबत परिपूर्ण माहिती त्यावेळी उपलब्ध नसल्याने सदर माहिती आपण मागाहून सादर करणार असलेबाबत समक्ष सांगितल्याने तसा त्यावेळी प्राथमिक स्वरुपात आपला जबाब नोंदविण्यात आला नव्हता, तो नोंदविण्यात येणार आहे.''

याआधी राजन साळवी यांना नोटीस : काही दिवसांपूर्वीच ठाकरेंच्या शिवसेनेचे राजापूर म तदारसंघाचे माजी आमदार राजन साळवी यांना नोटीस बजावण्यात आली होती. पण त्यानंतर त्यांनी भाजपामध्ये जाण्याचे निश्चित केले होते. मात्र, अद्याप प्रवेश निश्चित झाला नाही, मात्र आता नाईक यांना नोटीस दिल्यानंतर आता ते काय भुमिका घेणार हे बघावे लागणार आहे. मात्र, नोटीस आल्यानंतर अद्यापपर्यत त्यांनी आपली भूमिका जाहीर केली नाही. असे असले तरी ते या चौकशीला सामोरे जाणार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले आहे. मात्र, या लाचलुचपतच्या नोटीसीमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकारणात पुढील काही दिवसात आरोप प्रत्यारोप रंगणार यात मात्र शंका नाही.

## ढाणकी येथील सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालयात संत रविदास महाराज जयंती साजरी करा

### शासकीय आदेशाची अंमलबजावणी व्हावी; अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद शाखाकडून मागणी



दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** शासन परिपत्रकानुसार सन २०२५ मध्ये राष्ट्र पुरुष थोर व्यक्ती यांची जयंती/राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम सर्व शासकिय/निमशासकीय कर्यालयात साजरे करण्यात यावेत. असे आदेश दिले असून परिशिष्टात दर्शविलेले कार्यक्रम सार्वजनिक सुट्टी, साप्ताहिक सुट्टी (शनिवार व रविवार) आणि स्थानिक सुट्टीच्या दिवशी येत असले तरी ते साजरी करण्यात यावी. त्यासाठी विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील/जिल्ह्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सुचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहे.

त्या अनुषंगाने अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद शाखा ढाणकी यांनी दिनांक १२/०२/२०२५ रोजी येणाऱ्या संत रविदास महाराज जयंती शासकीय आदेशानुसार साजरी करण्यासाठी सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालय ढाणकी येथे संत रविदास महाराज यांची प्रतिमा भेट देऊन निवेदन दिले यावेळी अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद शाखा ढाणकी चे अध्यक्ष गजानन मारोती सुरोशे,चर्मकार समाज उपाध्यक्ष बालाजी पाचकोरे, गणेश सुरोशे, दिगांबर गायकवाड, दत्ता वाघमारे, विष्णू सुरोशे, प्रभाकर वाघमारे,संजेय पडतुडे,करण पडतुडे,अक्षय डोंगरे, नारायन पडतुडे, संभाजी पडतूडे उपस्थित होते.

### जळगावात एमपीडीएतून सुटलेल्या सराईतावर जीवघेणा हल्ला, ८ जणांनी काठीने मारत केले रक्तबंबाळ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील अमळनेर याठिकाणी एका सराईत गुन्हेगारावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. सात ते आठ जणांनी लाठ्या-काठ्यांनी हल्ला करत संबंधिताला रक्ताच्या थारोळ्यात पाडलं. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या हल्ल्यानंतर बराच वेळ सराईत बेशुद्धावस्थेत रस्त्यावर पडला होता. या घटनेची दखल पोलिसांनी घेतली आहे. घटनेचा तपास पोलीस करत आहेत.

# आरटीओ कार्यालय लवकरच होणार सुरु

**कार्यालयाचे काम अंतिम टप्प्यात अधिकाऱ्यांनी केली पाहणी**

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात नवीन आरटीओ कार्यालय मणजूर असून नगरपालिका व्यापारी संकुलाच्या तिसऱ्या मजल्यावर सुरू होणाऱ्या नवीन आरटीओ कार्यालयाची प्रभारी एआरटीओ हेमंत खराबे यांनी ३ फेब्रुवारी रोजी पाहणी केली.






खामगाव शहराला शासनाने एमेच ५६ हे क्रमांकासह मान्यता दिली असून लवकरच हे कार्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सर्व आवश्यक सुविधांची व्यवस्था पूर्ण केल्यानंतरच कार्यालय सुरू होईल. खामगाव आणि आसपासच्या सहा तालुक्यांतील नागरिकांना वाहनविषयक सेवा मिळवण्यासाठी प्रत्येक वेळी बुलढाणा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला जावे लागायचे. यामुळे दूरध्वनी आणि खर्चाचा ताण होता. त्यामुळे खामगावमध्ये आरटीओ कार्यालय सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती, आणि आता ती मागणी पूर्ण होणार असल्याचे दिसत आहे. शासनाने खामगावला नवीन आरटीओ क्रमांक ५६ दिला आहे. घाटाखालील सहा तालुक्यांतील नागरिकांना मोठा फायदा होणार उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होत आहे. खामगाव आरटीओ कार्यालयासाठी वाहनाच्या फिटनेस सर्टिफिकेट आणि ड्रायव्हिंग लायसन्स तपासणीसाठी जागेचा शोध घेतला जात आहे. एक किलोमीटर लांब जागा शोधण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानाचा पर्यायदेखील विचारात घेतला जात असल्याचे ते म्हणाले.

# कोट्यावधी रुपये पाण्यात; डोणगाव तहानलेलेच

दैनिक आपला विदर्भ

## जनतेच्या नावावर शासकीय निधीची उधळपट्टी

## बारा कोटी पाण्यात गेल्यानंतर आता तब्बल २१ कोटीची तरतूद : पाणी मिळेल की नाही याची शाश्वती नाही



**डोणगाव/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत व मतदारसंघातील राजकीय केंद्रबिंदू असलेल्या डोणगाववासीयांना पिण्याच्या पाण्याची सुविधा व्हावी,यासाठी सन २०१३- १४ मध्ये १२ कोटी रुपये राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत खर्च करून सुविधा करण्याचे प्रयत्न करण्यात आला. मात्र, हा निधी पुरता पाण्यात गेला असून डोणगाव वासीयांना पाणी मिळाले नाही. त्यानंतर आता जलजीवन मिशन अंतर्गत डोणगाव ग्रामपंचायत अंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल २० कोटी ९८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पहिल्याच कंत्राटदारांनी सदर योजना पूर्ण केली नाही व पुन्हा जलजीवन योजनेचे काम सुद्धा त्याच कंत्राटदाराला दिल्याने डोणगाव वासीयांना पाणी मिळेल की, नाही त्यांच्या घशाची कोरड कायम राहील, असा प्रश्न या निमित्ताने डोणगाववासी उपस्थित करीत आहेत.

डोणगाव हे मेहकर तालुक्यातील महत्त्वाचे शहर आहे. मेहकर मतदार संघातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे गाव असल्याने त्याचबरोबर डोणगा हे गाव राष्ट्रीय महामार्गावर असल्याने डोणगा शहराचा झपाट्याने विस्तार आहे होत आहे.मात्र, त्या प्रमाणात या ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने डोणगाव वासीयांना अनेक समस्यांना तोंड देत प्रत्येक दिवस काढावा लागत आहे. पाण्याची समस्या ही गंभीर असल्याने सन २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत डोणगाव ग्रामपंचायत अंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल १२ कोटी रुपयांच्या वर निधी खर्च करण्यात आला. या १२ कोटी रुपयांच्या निधीतून विहीर बांधकाम, पाण्याची टाकी स्ट्रक्चर, जलवाहिनी, फिल्टर,आदी कामे करण्यात आली.त्याचबरोबर धरणावरून पाण्याची पाण्याचा पुरवठा करण्यात आला. मात्र, गेल्या दहा वर्षातही सदर निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामातून डोणगाव वासीयांना पाणीपुरवठा झाला नाही.त्यामुळे त्यांना पाण्याची समस्या कायम राहिली. पिण्याच्या पाण्यासाठी दरवर्षी डोक्यावर हंडा घेत रानमाळ भटकंती करण्याची वेळ डोणगाववासी करीत आहेत.त्यानंतर जलजीवन मिशन अंतर्गत पुन्हा डोणगाव वासीयांच्या पाण्याची सुविधा करण्यासाठी तब्बल २० कोटी ९८ लाख रुपयांचा निधी मंजूर करून हर घर जल याप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला ५५ लिटर शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. राजकीय उदासीनता अधिकाऱ्यांची भ्रष्टवृत्ती यामुळे शासकीय निधी केवळ स्वविकास करण्यासाठी खर्च केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

### जलजीवन मिशनच्या कामाचा अहवाल मागितला आहे



डोणगाव ग्रामपंचायत मध्ये सन २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण कार्यक्रमांतर्गत कोट्यावधी रुपयाचा खर्च करून जलवाहिनी पाण्याची टाकी पाणी फिल्टर आदी कामे करण्यात आली आहेत.मात्र, सदर कामांमध्ये प्रचंड गैरप्रकार झाल्याने याचा डोंगावासीयांना लाभ झाला नाही.परिणामी, डोणगाव वासीयांची पाण्याची समस्या कायम राहिलेली आहे. आता जलजीवन मिशन अंतर्गत हर घर जल यासाठी ५५ लिटर शुद्ध पाणी देण्याचे नियोजन केलेले असून केंद्र शासनाकडे असून त्यासाठी तब्बल वीस कोटी ९८ लाख रुपयाचा निधी खर्च करण्यात येणार आहे. बारा कोटी रुपये खर्च करून करण्यात आलेल्या कामाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे.त्याचा अहवाल मागितला आहे. याबाबत दोषीवर कारवाई करून डोणगाव वासीयांना पिण्याच्या पाण्याची सुविधा करू, अशी माहिती मेहकर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली आहे.

### काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची : दिपक तांबारे



राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत असलेले अर्धवट काम व शहरातील निकृष्ट जल वाहिन्यामुळे डोणगाव वासीयांना पणी आता वीस कोटी रुपयांचे जलजीवन मिशन अंतर्गत काम करण्यात येत आहे.या संदर्भात ग्रामपंचायतने सर्व प्रक्रिया पूर्ण करून संबंधित विभागाला तसे ठराव दिलेले आहेत. सदर काम मार्च २०२५ पर्यंत करणे अपेक्षित आहे.यासंदर्भात वरिष्ठ स्तरावरून निर्णय घेऊन तशा सूचना दिल्या जातील. डोणगावला पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. आता सदर काम केव्हा पूर्ण होईल हे संबंधित विभागावर अवलंबून आहे. अशी माहिती डोणगाव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे यांनी दिली.

## विविध वृत्त...

### संत श्री गजानन महाराजांचा आशीर्वाद व मेहकर वासियांच्या शुभेच्छा घेऊन संपादक उध्दव फंगाळ कुटुंबासह महाकुंभ मेळाव्याकडे रवाना

पत्रकार बांधव व मेहकर वाशियांसाठी देवाकडे घालणार साकडे




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** संपादक उद्धव फंगाळ हे आपल्या कुटुंबासह आज चार फेब्रुवारी रोजी उत्तर प्रदेश येथील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महा कुंभ मेळाव्यासाठी मेहकर वरून रवाना झाले आहेत यावेळी उद्धव फंगाळ यांच्या धर्मपत्नी कालींदा फंगाळ,जावई रामा पूनवे मुलगी प्रियंका पुनवे चालक व नातेवाईक आकाश काळे या सर्वांनी मेहकर येथील श्री संत गजानन महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले तर महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बांधवांना चांगले दिवस आले पाहिजेत त्याचबरोबर मेहकरच्या विकासासाठी सुद्धा उध्दव फंगाळ हे महा कुंभ येथील देव देवतांना साकडे घालणार असल्याचे त्यांनी सांगितले

### नागपुरात होणाऱ्या भारत विरुद्ध इंग्लंड क्रिकेट सामन्यासाठी वाहतूक पोलिसांकडून मार्गदर्शन सूचना जाहीर




**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरात ६ फेब्रुवारी भारत विरुद्ध इंग्लंड क्रिकेट सामना होणार आहे. यासाठी नागपुरात वाहतुकीची विशेष सुविधा करण्यात आली आहे. प्रत्येक वेळेसच मॅचच्या सुरुवातीला आणि मॅच संपल्यानंतर खूप ट्राफिकची समस्या उद्भवते. यामुळे पार्किंगची सुविधा वाढवण्यात आली आहे.

आतापर्यंत सगळ्यात जास्त पार्कींगची सुविधा करण्यात आली आहे. त्यासोबतच ट्रॅफिक मॅनेजमेंटसाठी मॅप ही तयार केले आहे आणि तो डिजिटल माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. जामठा स्टेडियम पाशी ए, बी, सी, डी, इ, एफ, जी, या माध्यमांच्या पार्किंग क्रमांक तयार केले आहेत, हे १७ एकर पेक्षा जास्त आहेत. मॅचच्या दिवशी ज्यांची गाडी रस्तावर पार्कींग केलेली दिसेल अशा लोकांवर कारवाई देखील करण्यात येणार आहे. या सोबतच वर्धी रोडवरील नागपूर ते जामठा रोडवर या वेळी मोठ्या जड वाहनांसाठी बंद करण्यात येणार आहे.

सर्व बंदोबस्त करण्यासाठी ५५५ वाहतूक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहे. यासोबतच प्रत्येक पार्किंग मध्ये १५ ते २० कर्मचारी आणि १५ ते २० वॉलेंटियर्स असणार आहेत. या सर्व परिसरावर ड्रोन च्या माध्यामातून लक्ष ठेवण्यात येणार आहे, जेणेकरून कोणत्याही प्रकारचा वाहतुकीत अडथळा येऊ नये आणि ट्राफिक जाम होऊ नये यासाठी सर्व परिसरावर ड्रोन च्या माध्यामातून लक्ष ठेवण्यात येणार असून, डिजिटल मॅप द्वारे पार्किंगची सुविधा पाहता येणार आहे.

## सिंदखेडराजा मतदार संघातील संत चोखासागर धरणातून आमदार मनोज कायदे यांनी सोडले पाणी





### मतदार संघातील ४४ गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** सिंदखेडराजा मतदार संघातील खडकपूर्णा नदीपात्रातील पाणी साठा संपला असल्याने बहुतांश गावातील शेतकऱ्यांना पिकाला पाणी व जनावरांच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती ही बाब लक्षात घेता मतदार संघातील आमदार मनोज कायदे यांनी खडकपूर्णा नदीपात्रात पाणी सोडण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधून आज ४ फेब्रुवारी रोजी अधिकाऱ्याच्या उपस्थित पाणी सोडले पाणी सोडण्यासाठी संबंधित सर्वच विभागाचा समन्वय साधतं पाठपुरावा केला होता यामुळे नदीकाठच्या सुमारे ४४ गावांचा पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याचे समाधान वाटल्याचे आमदार मनोज कायंदे यांनी सांगितले सिंदखेडराजा मतदार संघातील डिग्रस, निमगाव वायाळ,दुसरबिड,देवखेड लींगा येथील कोल्हापूरी बंधारे भरून शेतीसाठी व जनावरांच्या पाण्याची व्यवस्था झाल्यामुळे शेतकरी बांधवांनी आमदार मनोज कायंदे यांचे आभार मानले.

## शासन संपत्ती ही जनतेची संपत्ती असून टिकवण्याची जबाबदारी ही आपली असते! : महेश पिंपरवार

दैनिक आपला विदर्भ



**ढाणकी/प्रतिनिधी :** शासन जनते साठी बस, रस्ते, वीज आणि पाणी देण्यासाठी वेग वेगळे योजना काढून जनतेच्या सेवेसी आणतो,तेच संपत्ती टिकवण्याची जबाबदारी जनतेची असते. पण जनता शासन संपत्ती म्हणून त्याचा नुकसान करत असतात. जनतेला हे संपत्ती आपलीच आहे हे आवगत नसल्याने लोक आपल्या समोरील सिमेंट रस्ते नळ घेण्यासाठी किंवा आपल्या घरातील पाणी बाहेर काढण्यासाठी रस्त्याचे नुकसान करतात. पण असे सगळे नसतात याचा परिचय ढाणकी येथील भाजप मंडळ अध्यक्ष महेश पिंपरवार यांना बगुन येतो.त्यांनी आपल्या घराचे बांधकाम असल्यासारखे आपल्या घरासमोर झालेल्या सिमेंट रस्त्याची देखभाल करत तो रस्ता दीर्गकाळ टिकवण्यासाठी त्यांनी रस्त्यावर आपल्या बोर वेल चे पाण्याने तीन टाईम पाणी टाकत आहे.त्यांनी शासन संपत्ती ही जनतेची संपत्ती असून टिकवण्याची जबाबदारी ही आपली असते असे संदेश जनतेला दिल्यामुळे त्यांच्या या उपक्रमाचे लोक कौतुक करत आहे.

## ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान पोलिसांनी जप्त केल्या चार तलवारी, एक पिस्टल; दोन आरोपींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

दैनिक आपला विदर्भ



**धुळे/प्रतिनिधी :** आगामी सणउत्सवांच्या पार्श्र्वभूमीवर धुळे जिल्हा पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. या पार्श्र्वभूमीवर पोलीस प्रशासनाने ऑल आऊट ऑपरेशन मोहीम राबविण्यात सुरुवात केली असून शहरात आणि संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांनी राबवलेल्या ऑलॉट ऑपरेशन मोहिमेत वेगवेगळ्या कारवाया करण्यात आले आहेत. यात एक पिस्टल, मॅक्झिनसह एक जिवंत राऊंड आणि चार तलवारी जप्त करण्यात आले आहेत. या सोबतच गांजा, गावठी हातभट्टी दारू आणि मोटार वाहन कायद्यान्वये देखील धडक कारवाई करण्यात आले आहेत.

धुळे पोलिसांनी राबवलेल्या या कारवाईत गावठी हातभट्टीवरील दारूच्या केलेल्या कार्यांमध्ये १ हजार ४२५ लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त करण्यात आली असून जुगार कायद्यान्वये ११ केसेस दाखल करण्यात आले आहेत. तसेच मोटार वाहन कायद्यान्वये १११ केसेस करण्यात आल्या असून ३७ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे आगामी सण आणि उत्सवांच्या पार्श्र्वभूमीवर ही कारवाई देखील येत्या काळात सुरू राहणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे.

# मुख्य चौकात अज्ञात व्यक्तीने उभारला निळा ध्वज

### प्रशासन खडबडून झाले जागी : सामंजपणाने सुटला प्रश्न

दैनिक आपला विदर्भ

■ अबुलतीब खान

**सुलतानपूर: लोणार. तालुक्यातील सुलतानपूर हे गाव शेगाव पंढरपूर _ नागपूर बॉम्बे हायवेवर बसलेले असून या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील चौकात अज्ञात व्यक्तीने ३ फेब्रुवारी २०२५ रोज रात्री धम्मचक्र अंकित असलेला निळा ध्वज उभारला आहे. ही घटना सकाळी उघडकीस आल्याबरोबर मोठ्या संख्येने बौद्ध बांधव तसेच गावकरी या ठिकाणी उपस्थित झाले. मात्र, नागरिकांच्या सामंजस्यपानातून सदर प्रश्न सोडविण्यात आला.**








तसेच फार मोठा फौज फाट्यासह पोलीस प्रशासन अधिकारी आणि तहसीलचे अधिकारी या ठिकाणी उपस्थित होऊन या ध्वजाच्या संदर्भात चर्चा करून हा विषय सामांजसपणाने मिटविण्याचा प्रयत्न केला आणि हा ध्वज आहे त्याच ठिकाणी ठेवण्यात आला.

अनेक बौद्ध बांधव तसेच गावकरी आणि पोलीस अधिकारी तसेच तहसील अधिकारी यांच्यात चर्चा होऊन बौद्ध बांधवांनी लेखी आश्र्वासन दिले की, या ठिकाणी असलेल्या ध्वजाल कोणत्याही प्रकारची छेडछाड झाल्यास आम्ही जबाबदार राहू, तुमच्यापर्यंत कोणत्याही प्रकारची आमची तक्रार येणार नाही.अशा प्रकारचे एक पत्र लिहून पोलीस प्रशासन आणि तहसील प्रशासन यांच्या स्वाधीन करण्यात आलेले आहे.यावेळी जिल्हा उपनिरीक्षक बुलढाणा बी. बी. महामुनी, डीवायएसपी प्रदीप पाटील, एसडीओ रवींद्र जोगी, मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार भाऊराव घुगे, बिबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील,डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमर नागरे, लोणार तहसीलदार भूषण पाटील, नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे,सुलतानपूरचे तलाठी संतोष पनाड, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी गजानन कावरके,हेड कॉन्स्टेबल शिवानंद केदार, हेड कॉन्स्टेबल राजेश जाधव, खूपिया पोलीस विजय बेंडवाल,खुपिया पोलीस संतोष चव्हाण,सुनील नागरे तसेच गावकरी संघपाल नागवंशी पनाड, महेंद्र पनाड, अनित्य गेवंदे, तंटामुक्ती अध्यक्ष राजेश पिंपरकर,पोलीस पाटील पती राजेश भानापुरे, स्टार ग्रुपचे अध्यक्ष शेख अख्तरभाई,अमीरभाई, सद्दामभाई, पत्रकार अबुतालिब खान,अनित्य घेवंदे ,अनिल ठाकरे, डॉ. रामेश्वर कडुकर इत्यादी आदीसह गावकरी मंडळी बौद्ध बांधव तसेच महिलांची उपस्थिती होती.